नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे | Year - 3rd
अंक - १०४ | Issue - 104
वार रविवार दि. ३१ ऑगस्ट २०२५ | Blow- Sunday Date 31 August 2025
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४ | Pages - 4
किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs
पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

सरसकट मराठे कुणबी ठरत नाहीत, तर ओबीसीत सरसकट जात कशी जाते? जरांगेंची विचारणा

मनोज जरांगे पाटलांशी थेट चर्चा करण्यासाठी शिंदे समिती आझाद मैदानात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : सरसकट मराठ्यांचा ओबीसीमध्ये समावेश करण्यासाठी गेल्या दोन दिवसांपासून आमरण उपोषण करत असलेल्या मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची आज शिंदे समितीने आझाद मैदानात जात भेट घेतली. या भेटीमध्ये शिंदे समितीकडून आजवर करण्यात आलेल्या कामाचा आढावा घेण्यात आला व सरकार काय करणार या संदर्भातील माहिती देण्यात आली. मात्र, शिंदे समितीकडून जे मुद्दे मांडण्यात आले त्याला बहुतांश मुद्द्यांना जरांगे पाटील यांनी विरोध केला. सरसकट मराठे कुणबी ठरत नसतील तर मग सरसकट जात ओबीसीमध्ये समावेश कशी केली जाते? अशी विचारणा जरांगे पाटील यांनी केली. दरम्यान, एखाद्या जातीला ओबीसी ठरवण्याचा अधिकार या समितीचा नसल्याचं शिंदे समितीने जरांगे पाटील यांना सांगितलं.

सरसकट समाजाला दाखला मिळू शकणार नाही

शिंदे समितीने एखाद्या व्यक्तीला जातीचा दाखला मिळू शकेल. मात्र, सरसकट समाजाला दाखला मिळू शकणार नाही सांगितलं. सर्व मराठ्यांना कुणबी ठरवता येणार नाही असे शिंदे समितीने जरांगे यांना सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र जरांगे पाटील आपल्या मागणीवर ठाम राहताना जोपर्यंत मराठा आणि कुणबी एकच असल्याचा जीआर निघत नाही तोपर्यंत आपण मागे हटणार नाही, असे स्पष्ट केले. जीआर काढण्यासाठी कोणतीही मुदत देणार नाही असेही त्यांनी स्पष्ट केलं. दरम्यान मराठवाड्यामधील मराठे कुणबी तत्वत: मान्य असल्याचं शिंदे समितीकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

हैदराबाद आणि सातारा गॅझेटिअरची तातडीने अंमलबजावणी करावी

हैदराबाद आणि सातारा गॅझेटिअरची तातडीने अंमलबजावणी करावी, यासाठी एक मिनिट सुद्धा वेळ देणार नाही अशी भूमिका जरांगे पाटील यांनी घेतली. शिंदे समितीकडून सांगण्यात आले की आतापर्यंत मराठवाड्यामध्ये दोन लाख ४७ हजार नोंदी मिळाले असून त्यापैकी दोन लाख ३९ हजार जणांना प्रमाणपत्र देण्यात आलं आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ५८ लाख कुणबी नोंदी सापडले असून त्यामध्ये दहा लाख ३५ हजार प्रमाणपत्र देण्यात आली आहेत. दरम्यान हैदराबाद आणि सातारा गॅझेटिअर संदर्भात शिंदे समितीने अजूनही याबाबतीत निर्णय व्हायचा असल्याचे सांगितलं. अभ्यास करूनच गॅझेटिअरचे रूपांतर कायद्यात करावा लागेल असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान गॅझेटिअरसाठी सहा महिन्यांचा कालावधी लागेल असेही त्यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले.

तब्बल सात वर्षांनी पीएम मोदी चीन दौऱ्यावर; शी जिनपिंग यांच्याशी द्विपक्षीय चर्चा होणार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



नवी दिल्ली : पंतप्रधान मोदी जपानच्या दोन दिवसांच्या दौऱ्यानंतर एससीओ शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी शनिवारी चीनला पोहाचले आहेत. ते सात वर्षांनी चीनला पोहोचले आहेत. एससीओ शिखर परिषदेव्यतिरिक्त, पंतप्रधान मोदी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि रशियाचे अध्यक्ष पुतिन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा देखील करतील. या दरम्यान, डिसेंबरमध्ये राष्ट्रपती पुतिन यांच्या भारत दौऱ्याच्या कार्यक्रमावर देखील चर्चा केली जाईल. पंतप्रधान मोदींचा हा दौरा अशा वेळी होत आहे जेव्हा संपूर्ण जग अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणांशी झुंजत आहे. ट्रम्प यांनी भारतावर ५० आणि चीनवर ३० टक्के टॅरिफ लादला आहे. एससीओ शिखर परिषद ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर दरम्यान चीनमध्ये होणार आहे. २० हून अधिक देशांचे नेते त्यात सहभागी होतील.

गेल्या महिन्यात परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी चीनला भेट दिली होती, जिथे त्यांनी अध्यक्ष शी जिनपिंग आणि परराष्ट्र मंत्री वांग यी यांची भेट घेतली होती. जयशंकर यांनी जलसंपदा डेटा शेअर करणे, व्यापार निर्बंध, एलएसीवरील तणाव कमी करणे आणि दहशतवाद आणि अतिरेकांविरुद्ध कठोर भूमिका घेणे यासारख्या मुद्द्यांवर चर्चा केली. मीडिया रिपोर्ट्सनुसार, या बैठकीमुळे मोदींच्या चीन दौऱ्याचा रोडमॅप तयार झाला होता.

मोदी आणि जिनपिंग यांची शेवटची भेट ऑक्टोबर २०२४ मध्ये रशियातील काझान येथे झालेल्या ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान झाली होती. यादरम्यान दोघांमध्ये द्विपक्षीय चर्चाही झाली. ५० मिनिटांच्या संभाषणात पंतप्रधान मोदी म्हणाले होते की 'सीमेवर शांतता आणि स्थिरता राखणे ही आपली प्राथमिकता असली पाहिजे. परस्पर विश्वास, परस्पर आदर आणि परस्पर संवेदनशीलता हा आपल्या संबंधांचा पाया राहिला पाहिजे.

शी जिनपिंग यांनी २०१९ मध्ये शेवटचा भारत दौरा केला होता. त्यानंतर दोन्ही नेत्यांची तामिळनाडूतील महाबलीपुरम येथे भेट झाली. ही भेट भारत-चीन संबंध मजबूत करण्यासाठी आणि परस्पर मतभेदांचे व्यवस्थापन करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल होते. दोन्ही नेत्यांनी सीमेवर शांतता आणि स्थिरता राखण्यासही सहमती दर्शविली.

शांघाय सहकार्य संघटना (एससीओ) ही २००१ मध्ये चीन, रशिया, कझाकस्तान, किर्गिस्तान, ताजिकिस्तान आणि उझबेकिस्तान यांनी स्थापन केलेली एक प्रादेशिक आंतरराष्ट्रीय संघटना आहे. नंतर २०१७ मध्ये भारत आणि पाकिस्तान त्यात सामील झाले. २०२३ मध्ये इराणही त्याचा सदस्य झाला. एससीओचे उद्दिष्ट सदस्य देशांमधील सुरक्षा, आर्थिक आणि राजकीय सहकार्य वाढवणे आहे. ही संघटना दहशतवाद, अतिरेकीपणा, अंमली पदार्थांची तस्करी आणि सायबर गुन्हे यासारख्या मुद्द्यांवर एक समान रणनीती तयार करते.

गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर !

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. शिक्षणामुळे केवळ ज्ञानसंपादन होत नाही तर आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक स्वावलंबनाची वाट खुली होते. म्हणूनच शासनाने शिक्षण सर्वांसाठी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी राज्य शासनाने विविध योजना आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. आजच्या युगात शिक्षण व्यवस्थेला विद्यार्थ्यांच्या गरजा, स्वप्ने आणि क्षमतांशी जोडणे ही काळाची गरज आहे. या जाणिवेतून शासनाने शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलली आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधन वृत्तीला आणि कौशल्यविकासाला चालना देणारे उपक्रम राबवले जात आहेत.

अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या

प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. राज्यात २६ फेब्रुवारी २०२४ पासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग आरक्षणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी तसेच शासकीय सेवांमधील सरळसेवेसाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. यानंतर मा. न्या. शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे म्हणजेच इतर मागास वर्ग प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाले आहे. मात्र या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना जातवैधता प्रमाणपत्र तातडीने न मिळाल्याने प्रवेश प्रक्रियेत अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर राज्यशासनाने अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सुरुवातीला सहा महिने, त्यानंतर तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. तरी देखील काही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवण्यास अडचणी येत आल्याचे निदर्शनास आले आणि अनेक विद्यार्थांनी तक्रारी केल्या होत्या याची राज्य शासनाने दखल घेऊन पुन्हा तीन महिन्यांची अतिरिक्त मुदतवाढ दिली आहे.

याशिवाय, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश जातवैधता प्रमाणपत्रांच्या अभावी त्यांचे प्रवेश रद्द होणार नाहीत आणि शैक्षणिक नुकसान टळणार आहे.

तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५)

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग आरक्षणाच्या अंमलबजावणीनंतर राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये मराठा विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रवेश घेतले आहेत.

तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५)

पदवी : १७ हजार ७७८, पदव्युत्तर : १ हजार ९२७, डिप्लोमा : ७ हजार ३५४ म्हणजेच एकूण २७ हजार ०५९ विद्यार्थी यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये डएइउ आरक्षणाअंतर्गत प्रवेश घेतलेला आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. ही योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा आणि कुणबी-जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने सुरु केलेली डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना ही विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. सन २०२२-२३ पासून या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळू लागले असून, उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढत असून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यास मदत होत आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यार्थ्यांना केवळ शुल्क सहाय्यच नव्हे, तर वसतिगृह, पुस्तके, अभ्यास साहित्य, प्रवास भत्ता आदी विविध सुविधा पुरवल्या जातात.यामुळे मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन.आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात उभे करण्यासाठी शैक्षणिक मदत होऊन उच्च व तांत्रिक शिक्षण घेताना होणारा आर्थिक खर्चही कमी होतो त्यामुळे उच्च शिक्षणात विद्यार्थांचे प्रमाण वाढते.

छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (उडचछठऋ)

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी लक्षित गटातील पीएच.डी. करणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१९ या वर्षापासून छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (उडचछठऋ) सुरु करण्यात आली आहे. सदर छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत लक्षित गटातील ३०७८ विद्यार्थ्यांना सारथी संस्थेद्वारे सन २०२३ पर्यंत अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.आज रोजी पर्यंत ३९३ विद्यार्थ्यांची झहऊ पुर्ण झाली असून ११० विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी नोकरी लागली आहे. या विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन विषयात पेटंट मिळाला आहे.

विद्यार्थ्यांना देण्यात येणारी विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे (णत्रछ) अधिछात्रवृत्ती :

JRF प्रमाणे (प्रथम ०२ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती णत्रछ निकषा नुसार ५ लाख ५३ हजार ३००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ४६ हजार १०८ आहे.

तसेच SRF प्रमाणे (२ वर्षानंतर पुढील ०३ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती ६ लाख २९ हजार ८००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ५२ हजार ४८३ देण्यात येते. अधिछात्रवृत्ती अंतर्गत अंतिमरित्या निवड झालेल्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य हे सारथीकडून ज्या रोजी अवार्ड लेटर दिले जाईल, त्या तारखेपासून पुढे पीएच.डी. करिता पाच वर्ष किंवा उमेदवार संशोधनासाठी विद्यापीठ महाविद्यालय/संस्था येथे रुजू झालेला असेल. (विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेच्या अहवालातील नमूद रुजू तारीख), या वेळी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून उमेदवाराच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी पीएच.डी. च्या फक्त उर्वरित कालावधीसाठी एकुण ५ वर्षांच्या कालावधीच्या आधारे किंवा उमेदवारांनी ज्या तारखेस संशोधन अहवाल सादर केला असेल, यापैकी जी अगोदरची तारीख असेल त्या तारखेपर्यंत अनुज्ञेय राहील. निवड झालेल्या लाभार्थ्यांना रक्कमे संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे (णत्रछ) अंतर्गत होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती अनुज्ञेय राहील.

अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ मध्ये पात्र विद्यार्थी ५०३, पीएचडी घेतलेले विद्यार्थी २४६, नोकरी लागलेले विद्यार्थी ७४ आहेत. सन २०२० मध्ये पात्र विद्यार्थी २०४, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ८०, नोकरी लागलेले विद्यार्थी १८ आहेत. सन २०२१ मध्ये पात्र विद्यार्थी ५५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ६४, नोकरी लागलेले विद्यार्थी १० आहेत. सन २०२२ मध्ये पात्र विद्यार्थी ८५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ४, नोकरी लागलेली विद्यार्थी १ आहेत. सन २०२३ मध्ये पात्र विद्यार्थी ९६९ आहेत.

परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असून आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील मुलामुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी/पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी QS World Ranking मध्ये २०० च्या आत रॅन्कीग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतील अशा मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील एकत्रितपणे ७५ विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राबविण्यात येत आहे.

सारथी संस्थेमार्फत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील विद्यार्थ्यांकरिता डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती सन २०२२-२३ पासून २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशित पात्र विद्याध्यर्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्रतील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे.

देशाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत भारतातील शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर ५०% पर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी, भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत. महाराष्ट्रातही विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम शिक्षण क्षेत्रात राबविले आहेत. यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांपर्यंत संधींची समान उपलब्धता आणि संशोधनाला चालना यावर अधिक भर देऊन गुणवत्तापूर्ण शैक्षणिक बदल करून राज्यातील शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख केली जात आहे.

– काशीबाई थोरात-धायगुडे
विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -३२

लोहा शहरातील अतिवृष्टी ग्रस्त इंदिरानगर भागाला मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी दिली भेट

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

लोहा/प्रतिनिधी

लोहा शहरात दिनांक २९ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे इंदिरानगर परिसरातील सखल भागात पाणी शिरल्यामुळे अनेक घरांची पडझड झाली असून संसार उपयोगी साहित्य, शालेय विद्यार्थ्यांचे दप्तर वह्या आदि सगळे साहित्य पावसाच्या पाण्यात भिजल्यामुळे यांचे अतोनात नुकसान झाले आहे.

तसे पाहिले तर लोहा शहरातील इंदिरानगर या परिसरात गोरगरीब, हमाल, कष्टकरी कामगार लोक राहतात आणि त्यांची घरे ही कच्च्या स्वरूपातील वीट -मातीची आहेत

या परिसरातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी लोहा न.प.चे कर्तव्यदक्ष ,कार्य तत्पर मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे व त्यांच्या टीमने भेट देऊन सदरील परिसराची पाहणी करून संबंधित कर्मचाऱ्याला तात्काळ पंचनामे करावेत अशा सूचना दिल्या.

यावेळी परिसरातील नागरिकांनी आपली व्यथा मुख्याधिकारी यांच्याकडे मांडली व त्यांनी

नागरिकांना दिलासा दिला. यावेळी परिसरातील नागरिकासमवेत मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, शहर अभियंता शरद राहेरकर,

पत्रकार तुकाराम दाढेल, पत्रकार शिवहार गालफाडे पत्रकार लहू श्रीमंगले यांची उपस्थिती होती.

सांगोला तालुकास्तरीय भव्य तबलावादन स्पर्धेमध्ये देवळी येथील श्रावण नवनाथ माळी यांचा प्रथम क्रमांक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री गणेश उत्सव आगमन व समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त माजी नगरसेवक श्री सोमेश यावलकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला येथे दत्त मंदिर महादेव गल्ली मंदिरामध्ये भव्य तबलावादन स्पर्धा २९ ऑगस्ट २०२५ नवीन आयोजित करण्यात आले होते.

या तबला वादन स्पर्धेमध्ये देवळी येथील श्रावण नवनाथ माळी या बालकाचा लहान गटांमध्ये परीक्षक. पंडित अतुल तांडे सर व त्यांची शिष्यवर्ग यांच्या निरीक्षणाने प्रथम क्रमांक दिला. श्रावण माळी याचा प्रथम क्रमांक आल्यामुळे माजी नगरसेवक योगेश यावलकर सर यांच्यातर्फे श्रावण माळी यांना सात हजार एक रोग रुपये रक्कम बक्षीस प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले. त्यांचा गौरव करून त्यांचे अभिनंदन केले.

श्रुती स्वरा कलाचे गायन क्लास घेणारी पंडित श्री रामदास रोंगे नाना गुरुजी, तबला क्लास घेणारी श्री सुधाकर कुंभार विरोधी व श्री धनंजय रुंगे गुरुजी, मच्छिंद्र कोळेकर, चिंतामणी खांडेकर शिवाजी अनपट, हनुमान भजनी मंडळ देवळे व त्यांची आजी गोदाबाई माळी वडील श्री नवनाथ माळी व आई वंदना माळी बहीण श्रावणी माळी व चुलते नागनाथ माळी डॉक्टर मोहन माळी दिलीप वसेकर समाधान वसेकर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

बोरीवली ग्रामपंचायतिच्या ग्रामपंचायत अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे/प्रतिनिधी : कंत्राटदाराच्या कामाचे बिल पूर्ण करण्यासाठी ३० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या बोरीवली (पडघा) येथील ग्रामविकास अधिकारी विद्या बनसोडे (वय ४६) यांना सोमवारी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. त्यांच्या विरोधात पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार कंत्राटदाराने पडघा येथील बोरीवली ग्रामपंचायतीच्या हद्दीत रस्त्याच्या दुरुस्तीचे काम केले होते. हे काम पूर्ण झाल्यानंतर त्याचे मंजूर बिल काढण्यासाठी ते ग्रामविकास अधिकारी विद्या बनसोडे यांच्याकडे गेले. बनसोडे यांनी देयकाची संपूर्ण रक्कम हवी असल्यास देयकाच्या तीन टक्के, म्हणजे ३० हजार रुपये लाच म्हणून देण्याची मागणी केली. या प्रकारामुळे त्रासलेल्या कंत्राटदाराने ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. एसीबीने या तक्रारीची पडताळणी करून सोमवारी सापळा रचला. ठरल्याप्रमाणे, ग्रामविकास अधिकारी बनसोडे यांनी लाचेची रक्कम स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्यांना तात्काळ ताब्यात घेतले. या प्रकरणी त्यांच्याविरोधात पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

स्वेरीत 'स्टार्टअप इग्निशन २.०'ही व्यवसाय आयडिया पिचिंगस्पर्धा संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) मधील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये दि. २१ ऑगस्ट २०२५ रोजीस्वेरीच्या ई-सेल व आयट्रिपल ई यांच्या संयुक्त विद्यमाने'स्टार्टअप इग्निशन २.०' या व्यवसाय आयडिया पिचिंग स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली व कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार यांच्या सहकार्यानेही स्पर्धा संपन्न झाली. प्रास्तविकात नुपूर आचलारे आणि प्रतिक्षा चौधरी यांनी'स्टार्टअप इग्निशन २.०'ची माहिती देवून स्पर्धेचे स्वरुप सांगितले. दीप प्रज्वलनानंतर प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले मुंबई मधील सरदार पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील

संगणक अभियांत्रिकी विभागातील डॉ. प्रमोद बिडे हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. त्यांनी आपल्या भाषणात'उद्योजकतेचे महत्त्व,स्टार्टअप सादर करण्यासाठीचीकौशल्ये व तयारी करण्यासाठी मुद्दे त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती,जागतिक स्तरावर स्टार्टअपचा प्रभाव तसेच भीती व अपयशावर मात करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. या स्पर्धेत विविध शाखांमधील २४ संघातील ८८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी डॉ. प्रमोद बिडे,स्वेरीचे विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम. एस. मठपती,डॉ. एच. बी. रोंगे व डॉ. सुमंत आनंद यांनी परिक्षण केले. विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना व प्रोटोटाईप्स या स्पर्धेतून सादर केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक'इग्रोनोमिक इनर कॅम ओपनर विथ नॉन-स्लीप ग्रीप अँड सेफ्टी लॉक'या प्रकल्पाला,द्वितीय क्रमांक'अमृत परेल'या पर्यावरणपूरक डिझाईनला मिळाला तर तृतीय क्रमांक'ॲग्रीट्रान्सबॉट'या कृषीक्षेत्रातील स्मार्ट रोबोटला मिळाला.या कार्यक्रमासाठी समन्वयक म्हणून प्रा. स्मिता गावडे यांनी कार्य केले. या कार्यक्रमासाठी आयट्रिपल ई कडून २५० डॉलर एवढे मानधन स्वेरी कॉलेजला मिळाले आहे. विद्यार्थ्यांमधील समीक्षा खटावकर, ई-सेल विद्यार्थी समन्वयक व आयट्रिपल-ई चे जागतिक इनोव्हेशन राजदूत समन्वयक फैयाज तांबोळी यांनी कामकाज पाहिले.सूत्रसंचालन नूपुर आचलारे आणि प्रतिक्षा चौधरी यांनी केले तर आभार डॉ. हर्षवर्धन रोंगे यांनी मानले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन,नेटवर्किंग व उद्योजकतेसाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

ओबीसी समाजाच्या धरणे आंदोलनाला पाठिंबा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

लातूर प्रतिनिधी/अमर जाधव : ओबीसी समजाचे बेमुदत धरणे आंदोलन या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी ओबीसी बांधव दररोज १० ते ५ वाजेपर्यंत बेमुदत आंदोलन करणार.

या आंदोलनाला उपस्थित माळी समाजाचे अध्यक्ष भरत काळे विश्वकर्मा सुतार समाज अध्यक्ष कृष्णा पांचाळ हरिभाऊ गायकवाड अताराम सर दगडू पडले साहेब अनिल जाधव सुदर्शन बोराडे व इतर सर्व ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

पंढरपूर उपविभाग, पंढरपूर यांची जुगार अड्ड्यावर कारवाई

दोन कोटी साठ लाखाचा मुद्देमाल जप्त

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : मा. अतुल कुलकर्णी,पोलीस अधीक्षक सो.सोलापूर सोलापूर ग्रामीण मौजे सोनंद तालुका सांगोला जिल्हा सोलापूर, हॉटेल मटन भाकरी त्या सिमेंट पत्र्याच्या खोलीत इसम नामे सचिन रावसाहेब काशीद राहणार सोनंद तालुका सांगोला, व शंभू लिंग प्रकाश तेरदाळ राहणार आतनी जिल्हा बेळगाव, हे विनापरवाना जुगार क्लब चालवत आहेत अशी बातमी सदर ठिकाणाहून छापा सदरी कारवाई करण्यात आदेशित करण्यात आले होते. त्यानंतर आम्ही सह पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे पंढरपूर उपविभाग पंढरपूर असे सांगोला पोलीस ठाण्यास दिनांक २९/८/२०२५ ठाणे दैनंदिन नोंद४६/२०२५ नोंद करून सह चार पोलीस पथकासोबत मौजे सोनं तालुका सांगोला जिल्हा सोलापूर येथे जाऊन मटन भाकरी हॉटेलच्या पाठीमागील सिमेंट पत्र्याच्या खोलीत अवैधरित्या जुगार खेळत असल्याचे चपळ कारवाई केली असता.

मौजे सोनंद तालुका सांगोला जिल्हा सोलापूर या ठिकाणी सुरू असलेल्या मटन भाकरी हॉटेलच्या पाठीमागील सिमेंट पत्राशीच्या शेडमध्ये ५० ते ५२ इसम पत्त्याची पैशाची पैज लावून जुगार खेळत असताना मिळून आलेले आहेत. तसेच काशिनाथ काउंटर मध्ये देशी विदेशी जवळ बाळगलेल्या स्थितीत आढळून आले आहेत

सिमेंटच्या पत्रा शेडमध्ये पत्ता खेळ असलेल्या इसमामध्ये दुचाकी वाहने चार चाकी वाहने रोख रक्कम पत्त्यातील रक्कम व जवळ बाळलेले मोबाईल, जुगार साहित्य, बावन पाणी पत्त्याचा डाव पत्रा शेड मध्ये असलेल्या पुढच्या टेबल, कपाटपेटी पत्त्याची डाव, कुलर व पैसे मोजण्यासाठी मशीन, त्यामध्ये रोख रक्कम १) रोख रक्कम १६,०९४८०/२) ६२ मोबाईल१३,९१,१००/. रुपये ३) २६ चार चाकी वाहनांची किंमत २,०९,००००००/ रुपये,२) ६१ दुचाकी वाहनाची किंमत२९,६०,०००/ रुपये३) देशी-विदेशी दारूची किंमत ११,१६५/रुपये असा एकूण२,६८,७२,१९५/रुपये अक्षरी (दोन कोटी ६८ लाख ७२ हजार १९५ रुपये) हा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. त्यामध्ये सांगोला पोलीस ठाण्याम ध्ये ५० सिस्मावर महाराष्ट्र जुगार कायदा १८८७, कलम चार-पाच व महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९, कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कामगिरी मा. अतुल कुलकर्णीसौ. सोलापूर जिल्हा ग्राम ीण व मा. अप्पर पोलीस निरीक्षक श्री प्रीतम यावलकरम मा. सह पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे उपाधीक्षक पंढरपूर उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली,मसपोनि. विभावरी रेळेकर,पोस इ./भारत भोसले,पोस इ/अनिल पाटील, श्रेणी पोसाई दत्तात्रय तोंडले, पोह/१८६ निलेश रोंगे, पोह/८५ कामत कर,पोहेको/१४१५ मंगेश रोकडे, इत्यादींनी काम पाहिले.

रात्रीच्या वेळी आठ वर्षाच्या मुलीला सापाने चावा घेतल्याने कु.आरोशी हिचा जागीच मृत्य

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : बुलढाणा जिल्ह्यात सापाच्या दंशामुळे ८ वर्षीय मुलीचा मृत्यू झाला आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील खंडाळा देवी गावात ८ वर्षाची आरोशी पडघान हिचा सापाच्या दंशाम ुळे मृत्यू झाला या दुर्दैवी घटनेने गावात शोककळा पसरली आहे.

बुलढाणा जिल्ह्याच्या मेहकर तालुक्यातील खंडाळा येथे रात्रीच्या वेळी घरात ८ वर्षाच्या आरोशी ला साप चावल्याने मृत्यू झाला ८वर्षाची मुलगी बाहेरगावी होस्टेलला टाकलेले होती, सणानिमित्ताने तिला घरी आणले होते घरी आणल्यावर सारखं मुलीला दोन दिवसापासून ताप यत होता. तिच्या आई-वडिलांनी खाजगी दवाखाना सुद्धा केला परंतु मुलीचा ताप कमी होत नव्हता. ८ वर्षाच्या चिमुरडीला दोन दिवसांपासून सारखी ताप येत होता.

खाजगी दवाखाना करून घरी नेल्यावर रात्रीच्या १२ च्या सुमारास मुलगी झोपेत असतांना ती म्हणाली आईला माझ्या गालाला काही तरी चावले आई ला वाटले उंदीर किंवा सुसरंन चावली असेल आईने तिला पाणी पाजले व काही मिनिटांने मुलीने पांढरे डोळे केले. तीला फिरल्या सारख झाले त्यानंतर आई वडीलानी तीला तातडीने रात्री २ वाजण्यच्या सुमारास मेहकर ग्रामीण रुग्णालयत घेऊन गेल्यावर रूग्णालयातल्या डॉक्टरांनी मुलीला मृत्य घोषित केले. आई वडिलांना अश्रू अनावर झाले.

मुलीचं पोस्ट मॉटम मध्ये साप चावल्याचं समोर आलं आहे.

मेहकर पोलीसांनी सकाळी १० च्या सुमारास पंचनामा केला. ८ वर्षाच्या आरोशी चा प्राण गेल्याने आई वडिलांचे अश्रू अनावर झाले.

८ वर्षाच्या आरोशीचं नेमकं जिवन सुरू झाले पण साप चावल्याने प्राण गेला. कामीना संतोष पडघान यांना तीन अपत्य होते एक मुलगा दोन मुली होत्या, त्यातील दोन दुसऱ्या नंबरची आरोशीला रात्री गालावर विषारी सापाने चावा घेतला त्यात आट वर्षाच्या आरोशी चा जागीच मृत्यू झाला. खंडाळा गावावर शोककळा पसरली.

जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, राजेश घनघाव यांचा गौरव

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

विजय शंकर घनघाव/कल्याण : सामाजिक बांधिलकी जपणारे, नेहमी सर्वांच्या म दतीसाठी धावणारे तसेच रेल्वे प्रवासी संघटनेच्या आणि प्रबुद्ध ग्रामस्थ मंडळ शिरोळच्या माध्यमातून आजवर केलेल्या कामाची दखल घेऊन जप जीवाला बहुउद्देशीय संस्था(नीती आयोग), टिटवाळा, कल्याण यांच्या वतीने श्री.मनोज सुमन शिवाजी सानप,श्री राजेश निर्मला अमृता घनघाव व श्री शिवाजी चव्हाण यांना यंदाच्या राज्यस्तरीय सन्मान२०२५ पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

सदरचा पुरस्कार ठाणे जिल्हा माहिती अधिकारी श्री मनोज सानप यांच्या हस्ते देण्यात आला. हा पुरस्कार अंबरनाथ येथील सुयोग महिला मंडळाने आयोजित केलेल्या ५१ व्या वर्धापन दिनाच्या दिवशी देण्यात आला, ट्रॉफी, सन्मानपत्र, मेडल आणि पुष्पगुच्छ तसेच सुयोग महिला मंडळाच्या वतीने वार्षिक स्मरणिका आणि पुष्पगुच्च देऊन सन्मानित केले. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी श्री मनोज सानप यांनी शहीद कॅप्टन विनायक गोरे यांच्या जीवनपटावर आधारीत २५ मिनिटांचा एकपात्री ५००० वा प्रयोग सादर केला,जप जीवाला बहुउद्देशीय संस्थेचे(नीती आयोग) अध्यक्ष, लेखक , संपादक श्री. एन.ए.कदम, जिल्हा माहिती अधिकारी श्री मनोज सानप, कारगिल योद्धा श्री गणेश भट, पर्यावरण अभ्यासक श्री.विजयकुमार कुट्टी,सुयोग महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ .सीमा दलाल आणि महिला पदाधिकारी म ोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आजपर्यंत राजेश घनघाव यांनी कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेच्या माध्यमातून कल्याण कसारा मार्गावरील ७५ वर्षापासून प्रलंबित असलेल्या उंबरमाळी आणि तानशेत हि दोन्ही स्थानके मंजूर करून घेतली, तसेच कसारा आसनगाव येथे तिकीट आरक्षण केंद्र तसेच या दोन्ही ठिकाणी लोहम ार्ग पोलिस स्टेशन मंजूर करून घेतले आहे. कल्याण कसारा कर्जत मार्गावरील प्रवाशांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांची कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटना आग्रही असते, तर प्रबुद्ध ग्रामस्थ मंडळ शिरोळच्या पाठपुराव्याने शिरोळ येथे प्राथमिक आरोग्य केंद्र,ग्रामपंचायतीचे भव्य कार्यालय,उंबरमाळी शिरोळ येथे प्राथमिक आरोग्य केंद्र,पोलिस चौकी, डांबरी रस्ते, दोन किलोमीटर रस्त्यावर विद्युतीकरण असे विविध सम ाजपयोगी कामे केलेली आहेत. त्यांना आता पर्यंत अनेक विविध पुरस्काराने सन्मानित केले गेले आहे.

माझ्या समाजसेवेची दखल घेऊन दिलेल्या पुरस्काराने मला अधिकाधिक कामे करण्याची ऊर्जा मिळाली आहे, असे मत राजेश घनघाव यांनी व्यक्त केले आहे.

राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त रिपाइं तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचे गौरव

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : रिपब्लिकन पक्ष(आठवले)चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री मा.राजाभाऊ सरवदे यांच्या ६८व्या वाढदिवसाच्या औचित्य साधून मैंदर्गी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले)तर्फे बारावीतील गुणवंत विध्यार्थ्यांचे गौरव करण्यात आले.

सदर कार्यक्रम रिपाइंचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांच्या अध्यक्षतेखाली व युवक जिल्हा सरचिटणीस विजय पोतेनवरु यांच्या नेतृत्वाखाली मैंदर्गी जि प प्रा मराठी शाळेत आयोजित केला होता.या प्रसंगी ज्येष्ठ नागरिक शरणप्पा मनिकडे,मुख्याध्यापक अप्पासाहेब विभूते,सैदप्पा झळकी,विजकुमार पोतेनवरु, सह शिक्षक मुन्नोळी सर,पत्रकार निंगप्पा निंबाळ,संतोष जन्ना,कांबळे आणी गुणवंत विध्यार्थी पवन पराड,भाग्यश्री कंतेनवरु सह विध्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.या वेळी मुख्याध्यापक विभूते सर बोलतांना माजी राज्यमंत्री डॉ बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ नेते आभ्यासु व्यक्तीमत्व निर्भीड व्यक्तीमत्व महाराष्ट्र राज्यातील बुलंद तोफ शिक्षण महर्षी दलित मित्र धगधगती ज्वालामुखी अन्याय ग्रस्त लोकांना सतत मदत व न्याय देणारे बुध्दीमान नेतृत्व संघटन कौशल्य आयुष्यमान राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या गुणगान केला. युवक आघाड़ीच्या वतीने मैंदर्गी जि प मराठी शाळेत शैक्षणिक साहित्य व मुलांना जेवण्यासाठि ५० ताट व बारावी परिक्षेत प्रथम,दुतीय क्रमांक आलेले विद्यार्थी चे सत्कार करण्यात आले.

राजाभाऊ सरवदे यांच्या पक्ष निष्ठा व आंबेडकरी चळवळीतील योगदान आजच्या तरुणांना प्रेरणादायी : अविनाश मडिखांबे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : रिपाइं(आठवले)चे प्रदेश अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री मा.राजाभाऊ सरवदे यांच्या पक्षा बद्दलचे निष्ठा व आंबेडकरी चळवळीतील योगदान हा आजच्या युवकांना प्रेरणादायी आहे.असे प्रतिपादन अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी व्यक्त केली आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) तडवळ शाखेच्या वतीने शुक्रवार दिनांक २९ ऑगस्ट रोजी रिपाईचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवदे यांच्या ६८ व्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक मराठी,कन्नड आणि उर्दू शाळा येथे सर्व विद्यार्थ्यांना शालेय वही,पेन, ३० चटई आणि केळी वाटप करण्यात आले.

यावेळी रिपाईचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष अविनाश मडीखाबे,रासपचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर,तालुका युवा अध्यक्ष अप्पा भालेराव,शहर सरचिटणीस शुभम मडीखांबे, तालुका उपाध्यक्ष उमेश शिवशरण,कन्नड शाळेचे मुख्याध्यापक गौतम कांबळे, मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका मुल्ला मॅडम, उर्दू शाळेच्या मुख्याध्यापिका शेख मॅडम, ग्रामपंचायत सदस्य महिबुब शेख,राजशेखर गायकवाड, राजू शिवशरण यांच्या सह शाळेचे शिक्षक कर्मचारी वर्ग आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विवेकानंद प्रतिष्ठान व्याख्यानमाला - पुष्प - ३

डॉ. भारत कन्हाड यांचे व्याख्यान

मराठा आरक्षण : जरांगे पाटील आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकांचे विश्लेषण

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सामाजिक आणि राजकीय चर्चेत मराठा आरक्षणाचा प्रश्न दीर्घकाळापासून केंद्रस्थानी राहिला आहे. शिक्षण, रोजगार आणि सामाजिक न्याय या तीनही क्षेत्रांमध्ये मराठा समाजाला अधिक संधी मिळाव्यात, यासाठी मागणी सातत्याने होत आहे. या मागणीला कायदेशीर स्वरूप देण्याचे अनेक प्रयत्न झाले, परंतु न्यायालयीन अडथळे आणि विविध कायदेशीर गुंतागुंत यामुळे या विषयावर समाधानकारक तोडगा निघू शकलेला नाही. २०१४ नंतरच्या काळात शासनाने काही महत्त्वपूर्ण उपक्रम राबविले. सारथी संस्थेची स्थापना, आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची उभारणी, भाऊसाहेब देशमुख निर्वाह भत्ता, फी सवलत, तसेच परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती या माध्यमातून शासनाने मराठा तरुणांसाठी शैक्षणिक व व्यावसायिक संधींचा मार्ग खुला करण्याचा प्रयत्न केला. तथापि, आरक्षणाचा मुख्य प्रश्न कायम प्रलंबित राहिला. २०२५ मध्ये मराठा नेते श्री. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनामुळे हा मुद्दा पुन्हा प्रखरतेने पुढे आला आणि संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष त्याकडे वेधले गेले. या पार्श्वभूमीवर जरांगे पाटील यांची भूमिका आणि राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची भूमिका या दोन्हींचे शांतपणे विश्लेषण करणे आवश्यक ठरते.

मराठा नेते श्री. मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाच्या आंदोलनाचे आघाडीचे नेतृत्व म्हणून गेल्या काही वर्षांत समोर आले आहेत. त्यांचा दृष्टिकोन स्पष्टपणे आक्रमक आणि भावनिक आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळालेच पाहिजे, असा त्यांचा ठाम आग्रह आहे. त्यांच्या मते शिक्षणातील संधी कमी होत आहेत, स्पर्धा परीक्षांमध्ये मागे पडण्याची भीती निर्माण झाली आहे आणि बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. या सर्व कारणांमुळे मराठा समाजाच्या तरुणांमध्ये असंतोष आहे. जरांगे पाटील यांनी उपोषणे, धरणे, तसेच मोठ्या प्रमाणावर लोकांना एकत्र करून आंदोलनाची दिशा ठरवली आहे. त्यांच्या शैलीत भावनिकता आणि तात्काळ परिणाम साधण्याचा प्रयत्न दिसतो. मराठा समाजाच्या भावना व्यक्त करण्याचे कार्य त्यांनी अत्यंत ठामपणे केले असून त्यामुळे समाजातील मोठा घटक त्यांच्या पाठीशी उभा राहिलेला आहे. समाजाचा आक्रोश शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांचे नेतृत्व निश्चितच महत्त्वपूर्ण ठरले आहे.

दुसरीकडे राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची भूमिका तुलनेने शांत, संयमी आणि कायद्याच्या चौकटीत बसवलेली आहे. शासनप्रमुख म्हणून त्यांना केवळ एका समाजाच्या मागणीकडे पाहून निर्णय घेणे शक्य नाही. राज्यातील सर्व घटकांचा विचार करून, संविधानाच्या मर्यादेत राहून मार्ग काढणे ही त्यांची जबाबदारी आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी याच मुद्द्यावर अनेक वेळा अधोरेखित केले आहे की दबावाखाली घेतलेले निर्णय न्यायालयात टिकत नाहीत आणि त्यामुळे दीर्घकाळासाठी त्याचा उपयोग होत नाही. २०१४ मध्ये त्यांच्या कार्यकाळात मराठा आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला होता, परंतु न्यायालयाने तो रद्द केल्यानंतर त्यांनी अधिक सावध भूमिका घेतलेली दिसते.

मुख्यमंत्री फडणवीस हे सांगतात की समाजातील दोन घटकांमध्ये तेढ निर्माण करणे त्यांच्या तत्त्वात बसत नाही. राजकारण चुलीत गेलं, पण समाजांना एकमेकांशी झुंजवत ठेवणे मान्य नाही, असे ते स्पष्टपणे नमूद करतात. शासनाने केलेल्या विविध योजनांची माहिती देत ते असे अधोरेखित करतात की मराठा समाजासाठी केवळ आरक्षणच नव्हे, तर शिक्षण, रोजगार व उद्योजकता या सर्व स्तरांवर प्रयत्न झाले आहेत. आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामुळे दीड लाख उद्योजक तयार झाले, सारथी संस्थेमुळे स्पर्धा परीक्षांमध्ये समाजाचा सहभाग वाढला, तसेच निर्वाह भत्ता, फी सवलत आणि परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती या योजनांमुळे अनेक तरुणांना मदत झाली. या उदाहरणांतून ते हे दाखवून देतात की शासनाने केवळ आश्वासनेच नव्हे, तर ठोस निर्णयदेखील घेतले आहेत.

या दोन भूमिकांचे विश्लेषण केले असता स्पष्ट होते की जरांगे पाटील यांची भूमिका आंदोलनात्मक आणि तातडीची आहे. ते समाजाच्या भावनांना दिशा देतात, शासनावर दबाव आणतात आणि मराठा तरुणांना एकत्र करतात. तथापि, त्यांच्या मागण्यांमध्ये कायदेशीर अडचणींवर सविस्तर चर्चा कमी दिसते. दुसरीकडे मुख्यमंत्री फडणवीस यांची भूमिका विवेकपूर्ण, कायद्याला धरून आणि दीर्घकालीन आहे. ते समाजात संघर्ष नको, स्थिरता आणि टिकाऊ उपाय हवे, या विचाराने पुढे जातात. शासनाच्या जबाबदाऱ्या लक्षात घेऊन ते प्रत्येक पाऊल उचलताना काळजी घेतात.

यातून असे दिसते की एका बाजूला समाजाचा भावनिक आविष्कार आहे, तर दुसऱ्या बाजूला शासनाची विवेकशील भूमिका आहे. दोन्हीही दृष्टिकोन आवश्यक आहेत. जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे प्रश्न गाजावाजा होतो आणि शासनाला तोडगा शोधण्यास भाग पाडले जाते. तर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या धोरणात्मक भूमिकेमुळे तोडगा टिकाऊ व कायदेशीर चौकटीत राहतो. समाजाचा आवाज आणि शासनाची जबाबदारी या दोन टोकांना जोडले गेले तरच योग्य निर्णय होऊ शकतो.

एकूणच, मराठा आरक्षणाचा प्रश्न हा केवळ एका समाजापुरता मर्यादित नाही, तर महाराष्ट्राच्या सामाजिक ऐक्याचा आणि तरुणांच्या भविष्याचा प्रश्न आहे. जरांगे पाटील यांनी समाजाच्या भावना आदरपूर्वक मांडल्या आहेत, तर मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्या भावनांना कायदेशीर आधार देण्याचा प्रयत्न केला आहे. या दोन्ही भूमिकांचा समन्वय साधला गेला, तर मराठा समाजालाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला न्याय मिळू शकेल. भावना आणि संविधान या दोन आधारस्तंभांचा मेळ साधण्यातच या प्रश्नाचे समाधान दडलेले आहे.

– डॉ. भारत कन्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.

आई-वडिलांचे स्वप्न साकार करायचे असेल तर विद्यार्थ्यांनी सोशल मीडिया पासून दूर राहावे : पोलीस निरीक्षक दीपक भिताडे

कै. वसंत अंबाजी भांगे यांच्या बाराव्या स्मृतिदिनानिमित्त सिद्धार्थ सोशल फौंडेशनच्या वतीने शालेय साहित्य वाटप

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी

आई-वडिलांचे स्वप्न साकार करायच असेल तर विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या इन्स्टा फेसबुक आणि व्हाट्सअप पासून दूर राहावे असे आवाहन पोलीस निरीक्षक दीपक भिताडे यांनी विद्यार्थ्यांना केले

कै. वसंत अंबाजी भांगे यांच्या बाराव्या स्मृतिदिनानिमित्त सिद्धार्थ सोशल फौंडेशन वतीने वागदरीच्या श्री एस.एस. शेळके प्रशालेत येथे शंभर मुलांना शालेय साहित्य बॅग आणि इतर शालेय साहित्य वाटप कार्यक्रम प्रसंगात अक्कलकोट नॉर्थ पोलीस स्टेशनचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक दीपक भिताडे यांनी बोलताना म्हणाले की, आजच्या युगात विद्यार्थ्यांना अभ्यासाची सवय लागत नाही आमच्या काळात आम्ही दोन दोन किलोमीटर चालत जाऊन शिक्षण घेत असे दोन दोन चार चार तास अभ्यास केल्यामुळे आज मी आपल्या समोर अधिकारी म्हणून उभे आहे आपल्या आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जिद्दीने अभ्यास करणे गरजेचे आहेत

आजचे नर्सरी पासून ते कॉलेज तरुण-तरुणी विद्यार्थी मोबाईल आणि इतर सोशल माध्यमाला कनेक्ट झाले आहेत या विद्यार्थ्यांना या सोशल माध्यमाचा फायद्या पेक्षा वाईट गोष्टी जास्त आकर्षक वाटू लागल्या आहेत यामुळे विद्यार्थ्यांनी सोशल माध्यमाच्या व्हाट्सअप फेसबुक इन्स्टा या असे इतर माध्यमातून दूर राहून आपल्या करियर आणि अभ्यासाकडे लक्ष देणे अधिकचे गरजेचे आहे असं भिताडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितल.. चंद्रशेखर भांगे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कष्ट करून आज लोकशाही न्यूज चॅनलच्या सर्वोच्च पदावर विराजमान झाले आहेत ही गोष्ट छोटी नाही खरंतर चंद्रशेखर भांगे यांच्या बातम्या मी नागपूर ग्रामीण पासून बघत आहे आता त्यांच्याच तालुक्यात मला काम करायची संधी मिळाली आहे याचा मला अभिमान आहे.

प्रस्तावना करताना कमलाकर सोनकांबळे म्हणाले की दर वर्षी वसंत भांगे यांच्या स्मृतिदिनानिमित्त गरीब वंचित घटकातील मुलांना विविध शालेय साहित्य वाटप करण्याचे काम सिद्धार्थ सोशल फौंडेशनच्या माध्यमातून चंद्रशेखर भांगे हे करत असताना माणूस कितीही मोठा झालं तरी आपल्या मातीशी असलेले नाळ कसे जपलं पाहिजे हे भांगे यांनी आदर्श घालून दिले आहे वंचित घटकातील मुलं शिक्षणपासून वंचित राहू नये यासाठी छोटासा प्रयत्न भांगे यांनी केले आहे

यावेळी मान्यवाराच्या हस्ते श्री ची पूजा करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आले शाळेतील मुलीने स्वागत गीत म्हणत सर्वांचे स्वागत केले

यावेळी कार्यक्रमाचे आयोजक आणि लोकशाहीची चंद्रशेखर भांगे श्री एस एस शेळके चेअरमन बसवराज शेळके, सिद्धार्थ सोशल फौंडेशनचे अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे, प्राचार्य अनिल देखमुख, गोगांवचे माजी सरपंच प्रदीप जगताप, वागदरीचे तंटामुक्त समिती अध्यक्ष लक्ष्मण सलगरे, हवालदार अंगद गिते, लक्ष्मण कांबळे,टेगळे,उद्योगपती बसवराज सोनकांबळे. महादेव सोनकवडे, नितीन हलसंगी, असलम मुल्ला, यासह मान्यवर उपस्थित होते सूत्रसंचालन राजेश्री शेळके मॅडम यांनी केले आभार मलय्या मठपती सर यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नितीन कुलकर्णी सर विद्याधर पुजारी सर घुगरे सर,यासह शिक्षक स्टाप परिश्रम घेतले

गणेश विसर्जन मिरवणुकीत लेझर लाईट, डॉल्बी सिस्टीम वापरास बंदी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्री गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटचा वापर मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे. डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटमुळे मिरवणूक बघण्यास आलेल्या नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचा विचार करता जिल्हयात दि २७ ऑगस्ट ते दि. ०६ सप्टेंबर २०२५ या कालावधीमध्ये सार्वजनिक गणेश मंडळांना मिरवणुकीमध्ये डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटचा वापर करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. याबाबतची अधिसूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जारी केली असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

सोलापूर जिल्हयामध्ये गणेश उत्सव सण पारंपारिक पध्दतीने व मोठ्या उत्साहाने साजरा केला जाणार आहे. सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाकडून मोठया प्रमाणात मिरवणुकांचे आयोजन केले जाते. सदर मिरवणुकीमध्ये गणेश उत्सव मंडळाकडून डॉल्बी सिट्रीम व व्हा लाईटचा मोठ्या प्रमाणात वापर होण्याची शक्यता आहे. मागील वर्षी गणेश मुर्ती आगमन मिरवणुकीवेळी मिरवणूक वघण्याकरीता आलेल्या भाविकांना डॉल्वी सिस्टीममुळे काही व्यक्तींना कानाचा व छातीचा त्रास होऊन कायमचे अपंगत्व अथवा जिवितास धोका निर्माण झाल्याची प्रकरणे निदर्शनास आलेली आहे. तसेच लेझर नाईट डोळयावर पडल्यास वयोवृध्द व लहान मुलांच्या डोळयाचा पडद्याला तसेच बुबळाला इजा झालेल्या घटना घडलेल्या आहेत.

त्यामुळे मिरवणुकीमध्ये डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटच्या वापरास प्रतिबंध करणे आवश्यक असलेने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भारतीय नारिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलग १६३ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार दि. २७ ऑगस्ट ते दि. ०६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत सोलापूर जिल्हयामध्ये सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाकडून आयोजित मिरवणुकीमध्ये मिरवणुकीदरम्यान डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटचा शो वापर करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती फौजदारी कारवाईस पात्र राहतील. असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. अशी माहिती प्रांताधिकारी श्री इथापे यांनी दिली.

पंढरपूर तालुका पोलिसांनी बोगस डॉक्टरांची टोळी केली जेरबंद

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी म वैद्यकीय शिक्षणाचे कोणतेही प्रमाणपत्र नसताना पंढरपूर तालुक्यातील रोपळे गावात राजस्थान आणि हरियाणा मधून आलेल्या तीन तोटे या डॉक्टरांनी दवाखाना थाटल्याची गोपनीय माहिती पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर यांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे रोपळे गावात छापा टाकला असता तीन तोतया डॉक्टर पुरणाची तपासणी करत असताना रंगी हात सापडले. गोविंद देवी राम प्रजापती (वय २७ राहणार भरतपुर राजस्थान) जहीर खान (वय वर्ष २२ राहणार पलवल हरियाणा) आणि अशिफ दिन मोहम्मद (राहणार भारतपूर राजस्थान) या तिघांच्या टोळीला पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की पंढरपूर तालुक्यांमध्ये तोतया डॉक्टरांची टोळी सक्रिय असली ची माहिती तालुका पोलीस ठाण्याला मिळाली होती. ही टोळी रोपळे गावात रुग्णांची फसवणूक करून त्यांच्यावर बेकायदेशीर रित्या उपचार करत असले की माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी धाड टाकली असता ते तीन तोटे या डॉक्टरांना रुग्णांची तपासणी करत असल्याचे निदर्शनास आले. त्यांची सखोल तपासणी केली असता त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात इंजेक्शन साठी वापरण्यात येणारी लहान मोठ्या औषधांच्या बाटल्या टॅबलेट्स व इतर वैद्यकीय साहित्य सापडले सदर आरोपींची टोळी राजस्थान आणि हरियाणातील असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. बीड येथे राहणारा सतीश सोळंकी यांच्या मध्यस्थीने हे आरोपींनी रोपळी गावातील एका वस्तीवर खोली भाड्याने घेतली होती व पोलिसांनी ती तीन भौगोल डॉक्टर असं पाच

जनावर गुन्हा दाखल केला आहे तो तो या डॉक्टरांना ताब्यात घेतली असून दोन फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

धम्मशिल कदम यांची रिपाइं (आठवले) युवा आघाडी कार्याध्यक्षपदी निवड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी (प्रतिनिधी): तुळजापूर येथील युवा कार्यकर्ते धम्माशील कदम यांची रिपाइं (आठवले) पक्षाच्या युवा आघाडीच्या धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष पदी तर जेष्ठ कार्यकर्ते प्रताप कदम यांची धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष पदी, तानाजी उमाजी कदम यांची तुळजापूर तालुका कार्याध्यक्ष पदी व लहु घोडके यांची ओबीसी आघाडी तुळजापूर शहराध्यक्ष पदी निवड करण्यात आली.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) पक्षात मा. ना. डॉ. रादासजी आठवले साहेब केंद्रीय सामाजिकन्याय मंत्री तथा रिपाइं राष्ट्रीय अध्यक्ष,तसेच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या उपस्थितीत तर रिपाइंचे प्रदेश जॉईन्ट सेक्रेटरी राजाभाऊ ओव्हाळ,धाराशिव

जिल्हाध्यक्ष विध्यानंद बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) या पक्षात प्रवेश केलेले वंचित बहुजन आघाडी चे तुळजापूर शहर अध्यक्ष धम्मशील कदम यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले)पक्षाने सन्मानपूर्वक दि.२७/०८/२०२५ रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले)पक्षाचे प्रदेश जॉईन्ट सेक्रेटरी राजाभाऊ ओव्हाळ, धाराशिव जिल्हाध्यक्ष विध्यानंद बनसोडे,धाराशिव जिल्हा सरचिटणीस सिद्धार्थ ओव्हाळ यांच्या हस्ते धाराशिव युवक जिल्हा कर्याध्यक्ष म्हणून धम्मशिल कदम तसेच तानाजी उमाजी कदम यांची तुळजापूर तालुका कर्याध्यक्ष पदी तर आयु. लहु घोडके यांची ओ.बी.सी. अघाडीच्या तुळजापूर शहर अध्यक्ष पदी व प्रताप कदम यांची

धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड केल्याचे सर्वाना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी तुळजापूर शहर अध्यक्ष वैजिनाथ पांडागले, धाराशिव जिल्हा कर्याध्यक्ष बाबासाहेब मस्के, धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष रणजित(बप्पा) गायकवाड इ. उपस्थित होते.

३४ हजार कोटींची गुंतवणूक; ३३ हजार रोजगार निर्मिती

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत यांच्या उपस्थितीत १७ सामंजस्य करार

महाराष्ट्राचा विविध कंपन्यांशी सामंजस्य करार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : श्री गणेशोत्सवाच्या शुभमुहूर्तावर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांच्या उपस्थितीत आज तब्बल १७ सामंजस्य करारांवर (चेण) स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारांची एकूण किंमत सुमारे ३३,७६८.८९ कोटी रुपये असून, त्यातून राज्यात सुमारे ३३,४८३ रोजगारनिर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

या गुंतवणुकीत इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, सोलार, इलेक्ट्रिक बसेस व ट्रक्स, संरक्षण व त्यासंबंधित विविध क्षेत्रांचा समावेश आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील उत्तर महाराष्ट्र, पुणे, विदर्भ, कोकण अशा सर्वच भागांमध्ये उद्योग उभारणीची संधी उपलब्ध होणार आहे.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात सहज आणि सुरळीत अनुभव मिळावा यासाठी शासन वचनबद्ध आहे. सामंजस्य स्वाक्षरीत करून न थांबता गुंतवणुकीच्या प्रत्येक टप्प्यावर राज्य शासन भागीदार म्हणून सोबत राहील. याबाबत कुठेही अडथळा येणार नाही.

श्री.फडणवीस यांनी मैत्री पोर्टल या वन-स्टॉप संकल्पनेचा विशेष उल्लेख केला. उद्योगांसाठी जमीन, परवानग्या आणि इतर मंजुरी तातडीने मिळवून देण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे.

ऊर्जाविषयक निर्णयांचा उल्लेख करताना श्री.फडणवीस म्हणाले की, राज्यात नुकताच ५ वर्षांचा मल्टी-इयर टॅरिफ मंजूर झाला आहे. वीजदर वर्षागणिक कमी होणार आहेत. पूर्वी दरवर्षी वीजदर ९ टक्क्यांनी वाढत असत, पण आता विजेचे दर कमी होणार आहेत. हे उद्योगांसाठी मोठे दिलासादायक ठरणार आहे.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले की, उद्योग क्षेत्रातील गुंतवणुकीचा जीवनचक्र (खपींशींशपीं डळषश ऊूलश्रश) राज्य सरकारने स्थिर आणि अंदाजपत्रित ठेवण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास वृद्धिंगत होईल.

या करारान्वये (१) मे.ग्रॅफाईट इंडिया लि. (सिंथेटिक ग्रॅफाईट अनोड मटेरिअल) यांनी रू.४७६१ कोटी रूपयांची गुंतवणूक केली असून याद्वारे ११६६ रोजगार निर्मिती होणार आहे. (२) मे.नेक्ट जनरेशन मॅन्युफॅक्चुरिंग प्रा.लि. (इलेक्ट्रॉनिक्स) (रू.१००० कोटी गुंतवणूक आणि १००० रोजगार निर्मिती), (३) मे.युरोबस भारत प्रा.लि., (इलेक्ट्रीक बस आणि पायाभूत सुविधा प्रकल्प) (रू.४२०० कोटी गुंतवणूक आणि १२००० रोजगार निर्मिती), (४) मे.व्हिर्च्यसो ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि. (इलेक्ट्रॉनिक्स)(रू.८०० कोटी गुंतवणूक आणि ५०० रोजगार निर्मिती), (५) मे.युनो मिंडा टो इनोव्हेशन प्रा.लि. (इलेक्ट्रॉनिक्स) (रू.१६५० कोटी गुंतवणूक आणि १४५० रोजगार निर्मिती), (६) मे.इनर्जी इन मोशन प्रा.लि. (इलेक्ट्रीकल ट्रक)(रू.१०६५ कोटी गुंतवणूक आणि ४५० रोजगार निर्मिती), (७) मे.जनरल पॉलिफिल्म प्रा.लि., (फिल्स)(रू.११०० कोटी आणि २०० रोजगार निर्मिती), (८) मे.पीएस स्टील एड पॉवर प्रा.लि. (स्टिल) (रू.१००० कोटी गुंतवणूक आणि ४३० रोजगार निर्मिती), (९) मे.बीएसएल सोलर लि.(सोलर) (रू.४५२९.८९ कोटी आणि ३५८२ रोजगार निर्मिती, (१०) मे.सुफ्लॅम मेटल्स प्रा.लि. (स्टिल)(रू.१००० कोटी गुंतवणूक आणि १४३० रोजगार निर्मिती), (११) मे.सुफ्लॅम इंडस्ट्रीज प्रा.लि. (स्टिल)(रू.११०० कोटी गुंतवणूक आणि १४३० रोजगार निर्मिती), (१२) मे.किर्तीसागर मॅटॅलॉईड प्रा.लि. (स्टिल)(रू.१४१२ कोटी गुंतवणूक आणि ८४५ रोजगार निर्मिती), (१३) मे.गोदरेज एड बायस मॅन्युफॅक्चरिंग कं.लि. (संरक्षण क्षेत्र) (रू.१५०० कोटी गुंतवणूक आणि ५०० रोजगार निर्मिती), (१४) मे.सेरम ग्रुप ऑफ कंपनीज (सेरम इन्स्टिट्यूट आणि रायझिंग सन सह) (जैव तंत्रज्ञान)(रू.५००० कोटी आणि ३००० रोजगार निर्मिती), (१५) अंबुजा सिमेंट लि.(सिमेंट) (रू.१००० कोटी गुंतवणूक आणि ३००० रोजगार निर्मिती), (१६) पॅरासन मशिनरी इंड प्रा.लि. (संरक्षण क्षेत्र)(रू.१००० कोटी गुंतवणूक आणि ३००० रोजगार निर्मिती) आणि (१७) मे.आर्सेलर मित्तल जीसीसी प्रा.लि. यांनी जीसीसी क्षेत्रात रू.५१ कोटी रूपयांची गुंतवणूक करार केला असून याद्वारे १००० रोजगार निर्मिती होणार आहे.

या सामंजस्य करारादरम्यान मुख्य सचिव राजेश कुमार, उद्योग सचिव डॉ. पी. अन्बळगन, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीनकुमार सोना, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलारासू, विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह आणि विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.